Publication: M'Times
Date: 2/3/2021
Page: 2
Column: 6/8

महाराष्ट्र टाइम्स
मुंबई । मंगळवार, २ मार्च २०२१ । mtedit@timesgroup

# आपत्कालीन वीजेसाठी सज्ज

म. टा. प्रतिनिधी



**मुंबई :** एखाद्या विद्युत उपकेंद्रात मोठा बिघाड झाल्यास हजारो घरांतील किंवा कार्यालयांतील वीजपुरवठा एकाएकी बंद होते, व्यवहार ठप्प होतात. बिघाड दुरुस्त होऊन वीजपुरवठा पूर्ववत होण्यास अनेकदा खूप अवधी लागतो. अशा वेळी तात्काळ वीजपुरवठा व्हावा यासाठी फिरते वीज उपकेंद्र उपयुक्त ठरते. अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने (एईएमएल) ही यंत्रणा कार्यान्वित केली आहे.

एईएमएलने अंतर्गत कौशल्याने प्रायोगिक तत्त्वावर १००० केव्हीए क्षमतेचे 'ट्रॉली माउंटेड मोबाइल उपकेंद्र' विकसित केले आहे. हे उपकेंद्र पुरवठ्याच्या उपयोजनानुसार काही तासांपासून ते दोन-तीन महिन्यांपर्यंतच्या काळासाठी स्थापित केले जाऊ शकते. उपकेंद्र उपकरणे बंद पडल्यास किंवा व्यावसायिक व निवासी ग्राहकांचा भार तात्पुरता मोकळा करण्याची वेळ आल्यास आपत्कालीन वीज पुरवण्याची मागणी याद्वारे पूर्ण होऊ शकेल.

एईएमएलनुसार, हे १००० केव्हीए क्षमतेचे फिरते उपकेंद्र आपत्कालीन सज्जतेसाठी तसेच तात्पुरत्या पुरवठ्याच्या तरतुदीसाठी सदैव उपलब्ध असणारा उपाय आहे. हे उपकेंद्र मर्यादित काळापुरते विशिष्ट स्थळावर वापरले जाऊ शकते. कोणत्याही स्थळावर, उपकेंद्रांच्या आवारात, प्रदर्शनस्थळी तसेच अन्य स्थळांवर प्रस्थापित केले जाऊ शकते. सध्या हे फिरते उपकेंद्र दहिसरच्या करोना केंद्रात तैनात करण्यात आले आहे. हे उपकेंद्र २५०, ४००, ६३० आणि १००० केव्हीए क्षमतेपर्यंत वीज तात्काळ पुरवू शकते. एचटी, एलटी, व्यावसायिक व निवासी ग्राहकांना वीजपुपवठा करणे हे या उपकेंद्रांचे कार्य आहे. मुख्य म्हणजे, हे उपकेंद्र केवळ एका वाहनाद्वारे सहज हलवता येण्याजोगे आहे.